पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/११/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१०/११/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.गावडे राजेंद्र तानाजी
४. मा.फुगे भिमाबाई पोपट
५. मा.डब्बू आसवानी (हिरानंद)
६. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.जगताप – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( पिंपरी चिंचवड शहरातील श्री.महेंद्र चव्हाण, यांनी मंगोलिया येथे झालेल्या जागतिक शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये ओपन वयोगटामध्ये भाग घेऊन सुवर्णपदक मिळविले आहे. त्यामुळे शहराच्या नावलौकीकत भर पडली असून शहरासाठी ही अभिमानास्पद बाब असल्याने त्यांचा मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्यावतीने सत्कार करणेत आला.)

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐन वेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) फुगेवाडी व्यायामशाळा चालविण्यास मिळणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) श्री.महेंद्र चव्हाण यांना अनुदान देणेबाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) कै.दशरथ नामदेव कापसे व्यायामशाळेवरील हॉल भाडे तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) स्वा.सावरकर व्यायामशाळा से.२७अ, निगडी सेवा शुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत - मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मनपाची बाहुबली व्यायामशाळा, निगडी प्राधिकरण सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत - मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मनपाचे एकूण १२ जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफ सफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्तीचे कामास मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.७) कु.प्राची प्रमोद गडकरी, हीला दोन वर्षाचा खेळाडू दत्तक योजनेचा लाभ देणेबाबत.

विषय क्र.८) महापौर चषक राज्यस्तर शरीरसौष्ठव स्पर्धा – २०१७ सांगवी येथे घेणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) मानधनावर कुस्ती प्रशिक्षक नेमणूक करणेबाबत – मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१३/१०/२०१७ व ३०/१०/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १०/११/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फुगेवाडी व्यायामशाळा, फुगेवाडी (जुन्या दवाखाना इमारत) ही व्यायामशाळा " जय महाराष्ट्र मित्रमंडळ " यांना ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यात देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १०/११/२०१७

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरातील श्री.महेंद्र चव्हाण, रा.जुनी सांगवी, पुणे – ३३ या खेळाडूने मंगोलिया येथे झालेल्या जागतिक शरीरसौष्ठव स्पर्धेत ओपन गटामध्ये भाग घेऊन त्या स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले असून आपल्या शहराच्या नावलौकीकात वाढ केलेली असून सदरची बाब शहराला अभिमानास्पद असल्यामुळे श्री.महेंद्र चव्हाण यांना र.रु.२,९९,९९९/- (अक्षरी र.रु.दोन लाख, नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव फक्त) अनुदान देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १०/११/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा. भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.दशरथ नामदेव कापसे व्यायामशाळेवरील हॉल दिनेस डान्स फॅक्टरी या सामाजिक संस्थेला ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,५००/- भाडे तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १०/११/२०१७

सुचक : मा. भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

सेक्टर २७ अ, निगडी प्राधिकरण मधील स्वातंत्र्यवीर सावरकर व्यायामशाळा ही दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर व मनपा नियमानुसार पाच वर्ष कालावधीकरीता CAPSTONE SPORTS & FITNESS या संस्थेस चालविण्याकरिता देण्यात यावी. CAPSTONE SPORTS & FITNESS प्राधिकरण या संस्थेचा रजिस्टर नंबर महा २०१९/२०१६ दि.०८/१२/२०१६ हा आहे. CAPSTONE SPORTS & FITNESS प्राधिकरण या संस्थेचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरची व्यायामशाळा CAPSTONE SPORTS & FITNESS प्राधिकरण यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९ विषय क्रमांक - ०५

दिनांक - १०/११/२०१७

सुचक : मा. भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ५८९, दि.०५/०७/२०१७ रद्द करुन त्या ऐवजी मनपाच्या वतीने निगडी प्राधिकरण येथील बाहूबली व्यायामशाळा ही चालविली जाते. सदची व्यायामशाळा " नवनाथ मित्र मंडळ, प्राधिकरण, पुणे ३३." या मंडळास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची बाहूबली व्यायामशाळा " नवनाथ मित्र मंडळ, प्राधिकरण, पुणे ३३." या मंडळास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०
विषय क्रमांक - ०६
दिनांक - १०/११/२०१७
विभाग - क्रीडा
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे
अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे
संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/११२१/२०१७, दि.३०/१०/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या एकूण १२ जलतरण तलाव (भोसरी तलाव वगळता) पाणी शुध्दीकरण, परिसस स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजाची मुदत प्रस्तावात नमुद रकाना क्र.७ मध्ये नमुद केलेप्रमाणे संपल्याने सदर कामाची क्रीडा, अल्प मुदतीची, ई-निविदा नोटीस क्र.३/२०१७-२०१८ कार्यवाही चालू असल्याने १२ जलतरण तलावाचे कामाची मुदत प्रस्तावात नमुद रकाना क्र.७ मध्ये नमुद केलेल्या तारखेच्या पुढील तारखेपासून ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होई पर्यंत, मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड, पुणे १९ यांना १० जलतरण तलाव व मे.सुमित स्पोर्टस् अन्ड फिटनेस इक्विपमेंट चिंचवड पुणे १९ यांना २ जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसस स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजास मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१
विषय क्रमांक - ०७
दिनांक - १०/११/२०१७
विभाग - क्रीडा
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे
अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे
संदर्भ : मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१२४/२०१७, दि.१६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६, दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२ दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे कु.प्राची प्रमोद गडकरी, राहणार ड्रीम होम रो हाउस नं.३, सेक्टर ६, प्लॉट न.३३, मोशी, प्राधिकरण, स्पाईन सिटी जवळ हीला खेळाडू दत्तक योजनेचा दोन वर्षाचा लाभ देणेकामी येणा-या र.रु.१,६२,४००/- (अक्षरी र.रु.एक लाख बासष्ट हजार चारशे फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरचा खर्च सन २०१७-१८ खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२
विषय क्रमांक - ०८
दिनांक - १०/११/२०१७
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे
अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे
संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने तसेच इंडियन बॉडी बिल्डींग फेडरेशन यांच्या मान्यतेने सांगवी येथे महापौर चषक राज्यस्तर शरीरसौष्ठव स्पर्धा २०१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७३ विषय क्रमांक - ०९

दिनांक - १०/११/२०१७

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

दत्तक योजनेतून राज्यस्तरीय कुस्ती प्रशिक्षक कु.संदेश केरभाऊ काकडे यांची कुस्ती प्रशिक्षक म्हणून प्रतिमहा र.रु.२०,०००/- (अक्षरी र.रु.वीस हजार फक्त) मानधनावर नेमणुक करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.उपसभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( बाळासाहेब नामदेव ओव्हाळ )**
**उपसभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२५०/२०१७
दिनांक : १५/११/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.